रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

बुधवार, दि. १७ एप्रिल, २०२२

# मराठी विभाग

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला

## विषय - प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांची जडणघडण व आंदोलने

## वक्ते - विश्वास सायनाकर

### अहवाल

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे दि. १७ जानेवारी, २०२२ रोजी निधन झाले. महात्मा जोतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि कर्मवीर भाऊराव पाटील या त्रयींचा विचारप्रभाव प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्यावर कायम राहिला. महात्मा जोतीराव फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, सयाजीराजे गायकवाड, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारवारशाला पुढे चालवण्याचे पूरक कार्य प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी तहयात केले. महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींना त्यांच्या कार्याची ओळख व्हावी, या उद्देशाने प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या सुरुवात प्राचार्य विश्वास सायनाकर यांच्या व्याख्यानाने झाली. 'प्रा. एन. डी. पाटील यांची जडणघडण व आंदोलने' या विषयावर बोलताना सायनाकर म्हणाले, "बहुजनांच्या अडचणीच्या काळात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे ठाम राहिले होते. एन. डी. पाटील सतत म्हणत होते की, मी चळवळीचा कार्यकर्ता आहे. आपणास खरेदी करणारा जन्माला यायचा आहे. इतका कठोर विचार निग्रह त्यांच्या सामाजिक व चळवळीच्या जीवनात होता. एन. डी. सरांनी सन १९७२ मध्ये दुष्काळी परिस्थितीत इस्लामपूर तहसील कचेरीवर काढलेला मोर्चा गाजला. मोर्च्यात त्यांना पोलिसांनी मारहाण केली. पोलिसांच्या गोळीबारात चार बळी गेले होते." तर आपल्या अध्यक्षीय मनोगतात कृष्णाकाठ उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष जे के. जाधव यांनी अन्यायग्रस्तांच्या बाजूने एन. डी. पाटील यांची लढण्याची भूमिका पटवून दिली. सदर कार्यक्रम यशास्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** ८९





विभागप्रमुख

मराठी विभागप्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस जि. सांगली

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)